दाखल ता.०५/०३/२०२६

नोंदणी ता.०५/०३/२०२६

निकाल ता.१४/०३/२०२६

## तडजोड हुकूमनामा

रे.क.न.७२/२०२६

नि. १०/अ

मे.दिवाणी न्यायाधीश सो व.स्तर,इचलकरंजी,

यांच्या कोर्टात...............

१.संजय दशरथ पोवार

व.व.५२,व्यवसाय- शेती व व्यापार,

रा.बसवेश्वर मंगल कार्यालय जवळ,

वादी

आभार फाटा,चंदुर,

ता.हातकणंगले,जि.कोल्हापुर

वि.

१.किरण दशरथ पोवार,

व.व.४१,व्यवसाय – शेती व व्यापार, प्रतिवादी

आभार फाटा,चंदुर,

ता.हातकणंगले,जि.कोल्हापुर

दावा हक्कज्ञापनाचा( दिलासा अधिनियम १९६३ कलम ३४ प्रमाणे) व कायम मनाई ताकीदीचा सर्व कारणाकरीता दावेची  आकारणी रु.१३००/-

यातील वादीचा दावा असा की,

१.दावा मिळकतीचे वर्णन

- जिल्हा व तुकडी कोल्हापूर पोट तुकडी इचलकरंजी मा. सह दुय्यम निबंधकसो वर्ग-१, इचलकरंजी यांचे अधिकार कक्षेपैकी तसेच तालुका व तालुका पंचायत समीती हातकणंगले पैकी मौजे चंदुर येथील बागायत शेत जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

क.ग. नंबर १९८ चे एकुण क्षेत्र हे.१-७८.०० आर आकार रूपये ५-६२ पैसेची पुरे नंबरची शेतजमीन  यापैकी लिहुन देणार यांच्या मालकीचे क्षेत्र हे.०-४२.९१ आर आकार रूपये १-३५ पैसे ची शेतजमीन  यापैकी मिळकत याची मोजमापे पुर्व बाजु -४०.१० फुट,पश्चिम बाजु -४०.१० फुट,दक्षिण बाजु ८०. फुट,उत्तर बाजु ८० फुट याचे २९८.१४ चौ.मी.याचे ३२०८.० चौ.फुट ची खुली मिळकत यासी चतुसिमा

पुर्वेस – याच गटातील करु बिरु मंगसुळे यांची मिळकतीतुन दक्षिण उत्तर चालीचा सोडलेला २० फुटी रस्ता

पश्चिमेस – १० फुट रुंदीचा सरकारी रस्ता

दक्षिणेस – करु बिरु मंगसुळे यांची मिळकत

उत्तरेस- याच गट नंबर मधील बिगरशेती झालेले प्लॉंट

येणेप्रमाणे चतुसिमेतील मिळकत मधील व त्यातील तदंगभुत वस्तु व इचमेंटच्या हक्कासह सदर मिळकत ही या दाव्याचा विषय होय.

२.यातील वादी व प्रतिवादी हे सख्ये भाउ आहेत.दोघानीही एकत्र कुटूबं असताना संयुक्त उत्पनातुन सदरची मिळकत विकत घेतली आहे. बंधु प्रेमापोटी सदरची मिळकत ही यातील प्रतिवादी यांच्या नावे सदरची मिळकत रजिस्टर दस्त नं. ५०४/२०१७ ने दि.०५/०४/२०१७ रोजी वर नमुद दावा मिळकत खरेदी घेतलेली आहे .सदर मिळकतीमधील हिस्सेबाबत भविष्यात वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वाद उपस्थित होवु नये म्हणुन त्यानी सदर मिळकत तोंडी वाटणीने आपआपल्या कब्जेवहीवाटीत घेतलेली आहे.तोंडी वाटणीपत्राप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचे वाटणीस व वहीवाटीस दिलेल्या मिळकती वर्णन पुढीलप्रमाणे -

३.यातील वादी संजय दशरथ पोवार यांच्या तोंडी वाटणीस व वहिवाटीस दिलेल्या मिळकतीचे वर्णन पुढिल प्रमाणे-

अ.जिल्हा व तुकडी कोल्हापूर पोट तुकडी इचलकरंजी मा.सह दुय्यम निबंधकसो वर्ग-१, इचलकरंजी यांचे अधिकार कक्षेपैकी तसेच तालुका व तालुका पंचायत समीती

हातकणंगले पैकी मौजे क.ग. नंबर १९८ चे एकुण क्षेत्र हे.१-७८.०० आर आकार रूपये ५-६२ पैसेची पुरे नंबरची शेतजमीन  यापैकी करु मंगसुळे यांच्या मालकीचे क्षेत्र हे.०-४२.९१ आर आकार रूपये १-३५ पैसे ची शेतजमीन यापैकी मिळकत याची मोजमापे पुर्व बाजु -४०.१० फुट,पश्चिम बाजु -४०.१० फुट,दक्षिण बाजु ८०. फुट,उत्तर बाजु ८० फुट याचे २९८.१४ चौ.मी.याचे ३२०८.० चौ.फुट खुली मिळकत  पैकी मोजमापे १६००.० फुट पुर्वेस- २०.०० फुट,पश्चिमेस २०.०० फुट,दक्षिणेस -८० फुट,उत्तरेस -८० फुट अशी  खुली मिळकत  यासी चतुः सिमा-

पुर्वेस- याच गटातील करु बिरु मंगसुळे यांची मिळकतीतुन दक्षिण उत्तर चालीचा सोडलेला २० फुटी रस्ता

पश्चिमेस – १० फुट रुंदीचा सरकारी रस्ता

दक्षिणेस – करु बिरु मंगसुळे यांची मिळकत

उत्तरेस- प्रतिवादी किरण पोवार यांची मिळकत

येणेप्रमाणे चतुसिमेतील मिळकत  असुन वर नमुद मिळकत ही वादी याना तोंडी वाटणीस व वहिवाटीस दिलेली आहे.

४.येणेप्रमाणे वादी व प्रतिवादी यांनी दावा मिळकतीचे वाटणीपत्र २०२३ सालीच केलेले आहे.असे असताना प्रतिवादी हे वाटपाप्रमाणे वहिवाट करणेस टाळाटाळ करित आहेत.प्रतिवादी हे वादी यांच्या वर नमुद मिळकतींमधील कब्जेवहिवाटीस दि.१२/०१/२०२६ रोजी हरकत अडथळा

करत आहेत.प्रतिवादी यानी वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान झालेल्या वाटपास नकार दर्शवला आहे. त्यामुळे वादी याना सदरचा दावा मे.कोर्ट मजकुरी गुदरणे भाग पडले आहे.

५.दाव्यास कारण- यातील प्रतिवादी यांनी सदर दावा मिळकतीचे वर झालेप्रमाणे वाटप नाकारले आहे.तसेच प्रतिवादी हे वादी यांच्या हिस्यात हरकत व अडथळा करत आहेत.त्यामुळे सदर दाव्यास कारण घडले आहे.व घडत आहे.प्रतिवादी यांनी वादी यांच्या शांततामय कब्जेवहीवाटीस दि.१२/०१/२०२६ इ.रोजी हरकत व अडथळा केला त्यावेळीस व त्यासुमारास दाव्यास कारण घडले.

६.दाव्याचा तपशिल-

रु.१०००/- दावा हक्कज्ञापनासाठी असल्याने दाव्याची आकारणी सदरी दाख

रु.३०० /- दावा कायम मनाई ताकीदीसाठी असलेने दाव्याची आकारणी केली ती सदरी दाखल

एकुण १३००/- रु. आकारणी

एकुण दाव्याची आकारणी केली असुन मनाईसाठी मुंबई कोर्ट फि स्टँप आर्टिकल २३ एफ शेडुल २ प्रमाणे रक्कम रुपये २००/- चा स्टँप आणि कलम ६ iv j प्रमाणे रक्कम रुपये २००/- चा स्टँप दिलेला आहे.

७. वादीने प्रतिवादी यांच्या विरुध्द या स्वरुपाचा दावा अन्य कोणत्याही कोर्टामध्ये दाखल केलेला नाही.सदर दावा मुदतीत आहे.

८.वादी व प्रतिवादी व दावा मिळकत ही मा.कोर्टाच्या स्थळ सिमेत येत असलेने सदर दावा दाखल करुन घेवुन तो चालवणेचा अधिकार मा.कोर्टाला आहे.

९.सबब यातील वादी यांची विंनती अशी की,

अ.यातील वादी व प्रतिवादी हे वर दाव्यात नमुद केलेप्रमाणे मिळकतीचे वाटपाप्रमाणे मालक व वहिवाटदार झाले आहेत.असे हक्कज्ञापन होवुन मिळावे.

ब.यातील प्रतिवादी यानी वादी यांच्यावर नमुद केले मिळकतीच्या वहिवाटीस हरकत अथवा अडथळी करु नये.अशी प्रतिवादी याना कायम मनाई ताकीद व्हावी.

क.प्रस्तुत दाव्याचा कोर्ट खर्च प्रतिवादी यांचेकडुन वसुल होवुन मिळावा.

ड.दाव्याच्या सर्व त्या अनुषंगीक बाबी वादी यांच्या वतीनेच व्हाव्यात.

इ.जरुर तर दावा दुरुस्त करु तशी परवानगी असावी.

आज रोजी राष्ट्रीय लोकअदालत मध्ये सन्मानिय न्यायाधिकारी ए.आर.कुलकर्णी सो राष्ट्रीय लोकअदालत मध्ये चौथे दिवाणी न्यायाधिशसो ज्यु.डी. इचलकरंजी यांचे

समोर सुरु वादी तर्फे अँड.आर.के.पाटील व प्र.वादी तर्फे डी.एम.बोहरा यांच्यात नि.८ ब अन्वये तडजोड झाली असुन तडजोड पुरसिस खालीलप्रमाणे -

यातील वादी व प्रतिवादी तर्फे आपसात तडजोड पुरसिस अशी की,

यातील वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुद्ध दावा दाखल केल्यानंतर वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान आपसात तडजोड झाली.वादी व प्रतिवादी यांचेदरम्याण मधस्ती केंद्रामार्फत दावा मिळकतीबाबत आपसात तडजोड घडवली.त्यांची सविस्तर माहीती पुढीलप्रमाणे

१.यातील वादी संजय दशरथ पोवार यांच्या तोंडी वाटणीस व वहिवाटीस दिलेल्या मिळकतीचे वर्णन पुढिल प्रमाणे-

अ.जिल्हा व तुकडी कोल्हापूर पोट तुकडी इचलकरंजी मा.सह दुय्यम निबंधकसो वर्ग-१, इचलकरंजी यांचे अधिकार कक्षेपैकी तसेच तालुका व तालुका पंचायत समीती हातकणंगले पैकी मौजे क.ग. नंबर १९८ चे एकुण क्षेत्र हे.१-७८.०० आर आकार रूपये ५-६२ पैसेची पुरे नंबरची शेतजमीन यापैकी करु मंगसुळे यांच्या मालकीचे क्षेत्र हे.०-४२.९१ आर आकार रूपये १-३५ पैसे ची शेतजमीन यापैकी मिळकत याची मोजमापे पुर्व बाजु -४०.१० फुट,पश्चिम बाजु -४०.१० फुट,दक्षिण बाजु ८०. फुट,उत्तर बाजु ८० फुट याचे २९८.१४ चौ.मी.याचे ३२०८.० चौ.फुट खुली मिळकत पैकी मोजमापे १६००.० फुट

पुर्वेस- २०.०० फुट,पश्चिमेस २०.०० फुट,दक्षिणेस -८० फुट,उत्तरेस -८० फुट अशी खुली मिळकत यासी चतुः सिमा-

पुर्वेस- याच गटातील करु बिरु मंगसुळे यांची मिळकतीतुन दक्षिण उत्तर चालीचा सोडलेला २० फुटी रस्ता

पश्चिमेस – १० फुट रुंदीचा सरकारी रस्ता

दक्षिणेस – करु बिरु मंगसुळे यांची मिळकत

उत्तरेस- प्रतिवादी किरण पोवार यांची मिळकत

येणेप्रमाणे चतुसिमेतील मिळकत असुन वर नमुद मिळकत ही वादी याना तोंडी वाटणीस व वहिवाटीस दिलेली आहे.

२. यातील प्रतिवादी किरण दशरथ पोवार यांच्या तोंडी वाटणीस व वहिवाटीस दिलेल्या मिळकतीचे वर्णन पुढिल प्रमाणे

अ.जिल्हा व तुकडी कोल्हापूर पोट तुकडी इचलकरंजी मा.सह दुय्यम निबंधकसो वर्ग-१, इचलकरंजी यांचे अधिकार कक्षेपैकी तसेच तालुका व तालुका पंचायत समीती हातकणंगले पैकी मौजे क.ग. नंबर १९८ चे एकुण क्षेत्र हे.१-७८.०० आर आकार रूपये ५-६२ पैसेची पुरे नंबरची शेतजमीन यापैकी करु मंगसुळे यांच्या मालकीचे क्षेत्र हे.०-४२.९१ आर आकार रूपये १-३५ पैसे ची शेतजमीन यापैकी मिळकत याची मोजमापे पुर्व बाजु -४०.१० फुट,पश्चिम बाजु -४०.१० फुट,दक्षिण बाजु ८०. फुट,उत्तर

बाजु ८० फुट याचे २९८.१४ चौ.मी.याचे ३२०८.० चौ.फुट खुली मिळकत  पैकी मोजमापे १६००.० फुट, पुर्वेस- २०.०० फुट,पश्चिमेस २०.०० फुट,दक्षिणेस -८० फुट,उत्तरेस -८० फुट अशी  खुली मिळकत  यासी चतुः सिमा-

पुर्वेस- याच गटातील करु बिरु मंगसुळे यांची मिळकतीतुन दक्षिण उत्तर चालीचा सोडलेला २० फुटी रस्ता

पश्चिमेस – १० फुट रुंदीचा सरकारी रस्ता

दक्षिणेस – वादी संजय पोवार  यांची मिळकत

उत्तरेस- प्रतिवादी यानी घेतलेली स्व मिळकत

येणेप्रमाणे चतुसिमेतील मिळकत  असुन वर नमुद मिळकत ही प्रतिवादी याना तोंडी वाटणीस व वहिवाटीस दिलेली आहे.

३.येणेप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचे मध्ये आपसात तडजोड झाली आहे. सदर आपसात तडजोड पुरसिसप्रमाणे वादी व प्रतिवादी याच्या दरम्यान दावा मिळकतीचे वाटप आले आहे. सदर तडजोड पुरसीस प्रमाणे वादी व प्रतिवादी यांनी मिळकत प्रत्यक्ष कब्जेवाहिटीस घेतलेली आहे.त्यास वादी व प्रतिवादी यांची एकमेकास कोणतीही हरकत किंवा तक्रार नाही.

४.यातील वादी व प्रतिवादी यांनी दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी वर नमुद केलेप्रमाणे आपली नावे व क्षेत्र नोंद करून

घेणेस एकमेकास कोणतीही हरकत किंवा तकार नाही. आता वादी व प्रतिवादी यांचा एकमेकांच्या मिळकतीमध्ये कोणताही संबंध राहिलेला नाही. भविष्यात एकमेकांच्या मिळकतीमध्ये कोणताही हक्क व  हिस्सा सांगणेचा नाही मा. तलाठी यांनी वादी व प्रतिवादी यांचे हिस्याप्रमाणे सातबारा पत्रकी नाव नोंद करून देणेचे आहे.

५.येणेप्रमाणे दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या ज्याच्या त्याच्या कब्जात घेतलेल्या आहेत. दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या ज्याच्या त्याच्या स्वतंत्र मालकीच्या मिळकती झालेल्या आहेत सदर आपसात तडजोड पुरसीस प्रमाणे दावा मिळकतीच्या सातबारा पत्रकी नाव नमुद करणेस यातील वादी व प्रतिवादी यांची एकमेकास कोणतीही हरकत किंवा तक्रार नाही. सदर आपसात तडजोड पुरसीस मधील संपुर्ण मजकुर हा वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

नियमीत दिवाणी दावा नं.७२/२०२६ मधील नि. १०/अ सोबत खर्चाचा आकडा

| अ.नं | तपशिल | वादी | प्र.वादी |
|---|---|---|---|
| १. | दावा अर्जास मुद्रांक | ४३०.०० | -------- |
| २. | वकील पत्रास मुद्रांक | १०.०० | १०.०० |
| ३. | वकिल फी | ३००.०० | ३००.०० |
| ४. | दाखल केलेल्या कागदास मुद्रांक | ------ | -------- |
| ५. | आदेशिका लागु करणेस मुद्रांक | ------ | -------- |
| ६. | मुदत अर्जास मुद्रांक | ------ | -------- |
| ७. | इतर अर्जास मुद्रांक | ------ | -------- |
| ८. | कमिशनरची फी | ------- | -------- |
| ९. | साक्षीदारास भत्ता | ------- | ------- |
| | एकुण | ७४०.०० | ३१०.०० |
| | वजा न दिलेला खर्च | ------ | ------ |
| १. | मुदत अर्जास स्टँप | ------- | ------ |
| २. | कोर्ट फि परतावा | ४३०.०० | ------- |
| | एकूण -- | ३१०.०० | ३१०.०० |

आज दि. १४/०३/२०२६ इसवी रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

Digitally signed by DATTATRAY BHAGWAN SATHE
Date: 2026.04.17 14:47:42 +0530

( श्री. डी. बी. साठेसो।)

२ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
इचलकरंजी

वादीतर्फे – अँड.आर.के.पाटील

प्र.वादी -अँड.डी.एम.बोहरा

(टीप- या वादातील पक्षकाराना अशी ताकीद देण्यात येते की त्यानी हजर केलेले कोणतेही दस्तऐवज जर ते परत नेले नाही तर अपील झाले असल्यास अपीलाची निकाल झाल्यावर नाश करुन टाकण्यास पात्र ठरतील)